**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२९२४**
**अपिलार्थी श्री. विनोद तुकारामजी बनसोड**
**सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६ (In continuation of order dt ०८.०१.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींना अपेक्षित माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई उपस्थित असून जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी आयोगास सादर केले की, आजच्या प्रकरणातील माहिती अर्जाच्या विषयासंबंधी अन्य माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थींना दि. १६.०५.२०२४ रोजी कळविले होते की, दि. २१.०६.२०२३ रोजी मा. मंत्री ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे न्यायालयात झालेल्या सुनावणीचे आदेश अद्यापर्यंत मा. मंत्री कार्यालयाकडून अद्यापर्यंत कार्यासनास उपलब्ध झालेले नाहीत. मा. मंत्री कार्यालयाकडून ज्यावेळी पारित झालेले आदेश या कार्यासनास प्राप्त होतील त्यावेळी ते आपणास उपलब्ध करुन देता येतील.

तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी केलेली दिलेले उत्तर योग्य ठरवून प्रथम अपील दि. १२.०७.२०२४ रोजी निकाली काढलेले आहे.

३. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १६.०५.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १२.०७.२०२४ उपलब्ध करुन देण्याची विनंती केली.

४. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १६.०५.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १२.०७.२०२४ ची प्रत अपिलार्थींना उपलब्ध करुन दिली व अपिलार्थी यांनी ती स्विकारली.

३. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

सत्यमेव जयते

8-4-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०८.०४.२०२६**

माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२९२४**

**अपिलार्थी श्री. विनोद तुकारामजी बनसोड**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
मंत्री, ग्रामविकास यांचे कार्यालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०००३२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
मंत्री, ग्रामविकास यांचे कार्यालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०००३२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०१.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित (प्रतिनिधी)
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १७.०६.२०२४ | - | १९.०८.२०२४ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.०९.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थीनी दि. १७.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांनी स्वत:बद्दल कनिष्ठ सहाय्यक (लेखा) कृषी विभाग, जिल्हा परिषद गोंदिया यांची दि. २१.०६.२०२३ ला मा. मंत्री ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे न्यायालयात झालेल्या सुनावणीचे आदेशाची सत्यप्रत मिळणेबाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थीनी दि. १९.०८.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थितस असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करताना जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थित आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

४. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीना अपेक्षित असलेल्या माहितीसह पुढील सुनावणी उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ११.०२.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०८.०१.२०२६**

8-1-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**